# पुण्य नगरी

बुधवार,११ ऑक्टोबर २०१७

smart Nanded


## जनमत चाचण्यांच्या प्रसिध्दीवर बंदी

नांदेड / प्रतिनिधी

मतदानापूर्वी जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या, सोशल मीडिया आदींच्या माध्यमातून बहुतांश राजकीय पक्ष जाहिराती करत असतात. तसेच जनमत चाचणी किंवा मतदानोत्तर चाचणी घेतली गेल्यास अथवा निकालाचे अंदाज प्रसिद्ध झाल्यास मतदान करणाऱ्या मतदारांवर त्यांचा प्रभाव पडू शकतो. त्यामुळे निवडणुकांमध्ये जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी घेणे त्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यास राज्य निवडणूक आयोगाने निर्बंध घातले आहे. निवडणूक कालावधीत सोशल मीडियावर येणाऱ्या मेसेजवर आयोगाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात असून सायबर गुन्हे शाखा आणि तत्सम यंत्रणांच्या सहाय्याने सोशल मीडियावर लक्ष ठेवण्यात येणार आहे.

# मनपा निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज!

## ५५० मतदान केंद्रे | ३३६१ कर्मचारी तैनात





नांदेड/ प्रतिनिधी

नांदेड वाघाळा मनपाच्या २० प्रभागातील ८१ जागांसाठी बुधवारी, सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी महापालिका सज्ज झाली आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी गणेश देशमुख यांनी तेथील परिस्थितीचा आढावा घेतला असून महत्त्वाच्या मतदान केंद्रांना भेटी देऊन केंद्रांची पाहणी केली. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, मतदानासाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. या निवडणुकीत प्रथमच व्हीव्हीपॅट मशीनचा वापर केला जाणार आहे. १२ ऑक्टोबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

११ रोजी मतदानासाठी नागरिकांनी निर्भयपणे आणि कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन आयुक्त देशमुख यांनी केले. निवडणुकीसाठी ५५० मतदान केंद्रे असून या मतदान केंद्रांसाठी राखीव कर्मचाऱ्यांसह एकूण ३ हजार ३६१ नेमणूक करण्यात आलेली आहे. सर्व मतदान केंद्रांवर १० रोजी दुपारपर्यंत सर्व अधिकारी आणि कर्मचारी रुजू झाले आहेत. तसेच सर्व मतदान केंद्रांवर मतदानाचे सर्व साहित्य रवाना करण्यात आले आहे. त्यासाठी १८९ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान केंद्रांसाठी एकूण २ हजार



५०० बॅलेट युनिट व ८०० कंट्रोल युनिटचा वापर करणार आहेत. एकूण ५५० मतदान केंद्रापैकी १३० संवेदनशील मतदान केंद्रे व २१५ इमारतीमध्ये मतदान केंद्रे राहणार आहेत. २० प्रभागात ८१ जागेसाठी ३ लाख ९६ हजार ८७२ एवढ्या मतदारांची संख्या आहे. यात पुरुष मतदारांची संख्या २ लाख ६ हजार ६४२१ तर महिला मतदारांची संख्या एक लाख ९० हजार ४०८ आणि इतर ४३ तृतीयपंथीय मतदार आहेत. निवडणुकीसाठी बीएलओमार्फत ६ व ७ ऑक्टोबरला मतदारांना घरोघरी जाऊन मतदार चिठ्ठीचे वाटप करण्यात आले असून ८ ऑक्टोबरला बीएलओ हे दिवसभर नेमून दिलेल्या बुथवर उपस्थित होते.

मतदान केंद्रावर आवश्यक त्या ठिकाणी मतदारांना व्हिलचेअरची व्यवस्था केलेली आहे. मतमोजणी प्रक्रिया शांततापूर्ण व सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी एकूण ३१२ अधिकारी व कर्मचाऱ्यांची आणि पोलीस बंदोबस्तासाठी आवश्यक तेवढ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या (पान ३ वर...)

### प्रथमच व्हीव्हीपॅट यंत्राचा वापर



महापालिका निवडणुकीमध्ये राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पहिल्यांदाच निवडणुकीत 'व्होटर व्हेरीफाईड पेपर ऑडिट ट्रेल-व्हीव्हीपीएटी' यंत्र वापरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निवडणुकीत या यंत्राचा प्रायोगिक तत्त्वावर वापर होणार आहे. या यंत्रामुळे आपण ज्या उमेदवाराला मतदान केले आहे, त्याच्याच खात्यात ते पडले आहे, याची खात्री मतदाराला होणार आहे. तसेच या यंत्राचा वापराच्या कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

### असा आहे पोलीस बंदोबस्त



मनपा निवडणुकीसाठी पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मीना, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त पोलीस अधीक्षक, ११ उपविभागीय पोलीस अधिकारी, ४८ पोलीस निरीक्षक, १२२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, १७०० पोलीस कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दलाची एक कंपनी, आरसीपीच्या ८ प्लाटून, गृहरक्षक दलाचे ८०० पुरुष जवान, १५० महिला जवान बंदोबस्त कामी तैनात करण्यात आले आहेत.

### मतदारांसाठी हेल्पलाईन

मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदान केंद्राचे नाव, ठिकाण, मतदाराचा अनुक्रमांक, बुथ क्रमांक इ. माहिती ऑनलाईन उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या मुख्य कार्यालयात हेल्पलाईन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी ११ रोजी सकाळी ६ ते सायं. ६ पर्यंत काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहाय्यक आयुक्त (प्रशासन), एल. के. चौरे यांच्या अधिन हा कक्ष कार्यान्वीत केला आहे. मनपा प्रशासनाचा दूरध्वनी क्र. (०२४६२) २६२६२६, २३४४६१, २३०७२१, २३००६० आहे त्यानुसार शहराच्या विविध भागातील संबंधित दूरध्वनी क्रमांकावर मतदान यादीतील नाव शोधणे व आवश्यक माहिती प्राप्त होणार आहे.